**महाराष्ट्र शासन**
आयुक्त यांचे कार्यालय,
अन्न व औषध प्रशासन,
महाराष्ट्र राज्य, सर्व्हे न. ३४१, वांद्रे
कुर्ला संकुल, रिझर्व्ह बँक समोर,
वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

**Government of Maharashtra**
Commissioner
Food & Drug Administration.
Survey No.341, Opp. Reserve Bank,
BKC, Bandra (E), Mumbai – 400051

---

जा क्र. असुमाका/ जप्त वाहने / /२०२६/१ दिनांक :- १६.०७.२०२६

# जाहीर नोटीस

अन्न व औषध प्रशासन, आयुक्तालयाच्या आवारात प्रशासनाने प्रतिबंधित अन्न पदार्थांची विक्रीसाठी वाहतूक करणाऱ्या वाहनांची जप्ती करुन ठेवली आहेत. सदर वाहने वर्षानुवर्षे एकाच जागी उभी असल्याने पावसाळयाच्या दिवसात सदर जप्त वाहनांमध्ये पावसाचे पाणी साचून त्यात डेंग्यू, मलेरीया तसेच इतर डासजन्य व साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली असून सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते.

त्यामुळे, या नोटीससोबत जोडलेल्या यादीतील जप्त वाहनांचे नोंदणीकृत/अधिकृत मालक अथवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वाहनाच्या ताब्याबाबत संबंधित सह आयुक्त (अन्न) , कोकण विभाग अथवा सह आयुक्त (अन्न), बृहन्मुंबई विभाग यांच्या कार्यालयात अथवा सक्षम न्यायधिकरणाकडे अर्ज सादर करावा.

निर्धारित मुदतीत कोणताही अर्ज प्राप्त न झाल्यास अथवा वाहनाच्या ताब्यासंदर्भात कोणताही वैध दावा करण्यात न आल्यास, संबंधित वाहनांबाबत लागू असलेल्या न्यायालयीन आदेश, सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश व प्रचलित कायदेशीर तरतुदींनुसार पुढील आवश्यक कार्यवाही, ज्यामध्ये लिलाव अथवा अन्य वैधानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची कार्यवाही समाविष्ट असू शकते, ती करण्यात येईल. त्याबाबत संबंधितांची कोणतीही तक्रार अथवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

या नोटीसीची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सोबत - जप्त वाहनांची यादी

(सं.कृ.कांबळे)
सह आयुक्त (अन्न) (मुख्यालय),
अन्न व औषध प्रशासन, म. राज्य,
मुंबई